PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 1

# मानवाधिकार

डॉ. संभाजी संतोष पाटील
**श्री. शि. वि. प्र. संस्थेचे महाविद्यालय,**
**शिंदखेडा, जि.धुळे**
(महाराष्ट्र) भारत

फार पुर्वीपसुन मानवी हक्कांचा विचार करण्यात आला असला तरी जगातील काही राष्ट्रांनी मानवाधिकारास मान्यता दिलेली आढळुन येते आणि मानवाधिकाराच्या संरक्षणाचीही जबाबदारी स्विकारण्यात आली. दुसऱ्या महायुध्दाच्या वेळेस जर्मन मधील नाझी राजवटीने लाखो निरपराध ज्युची हया केली. न्युरेबर्ग येथे १९४४—४६ साली चाललेल्या युध्द गुन्हेगारांच्या चौकशीत ज्या क्रूर घटना झाल्यात त्यामुळे मानवाधिकाराची गरज पुन्हा एकदा संपुर्ण जगास भासु लागली. १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या स्थापना पत्रात मानवी हक्कांना महत्वाचे स्थान देण्यात आले. १० डिसेंबर १९४८ला संयुक्त राष्ट्र संघांच्या आमसभेने मानवी हक्क जाहीर करणारे घोषणापत्र संमत करण्यात आले. सभासद राष्ट्रांनी त्या घोषणापत्रावर सहया केल्या. त्या घोषणा पत्रात असे नमुद करण्यात आले की, यापुढे कोणत्याही देशातील सरकारला आम्ही आमच्या नागरीकांना कसेही वागवु असे म्हणण्याचा नैतीक किंवा कायदेशीर अधिकार उरला नाही. आपल्या देशातील नागरीकांचे मानवी हक्क सुध्दा पायदळी तुडविण्याचा अधिकार केणत्याही सरकारला उरला नाही. कोणत्याही देशाचे सरकार आपल्या देशातील नागरीकांना मानवी हक्का पासुन वंचीत ठेवत असेल तर आंतरराष्ट्रीय समुदाय त्या सरकारवर हे हक्क बहाल करण्यासाठी दडपण आणु शकतो. या दृष्टीने मानवी हक्कांची घोषण ही फार महत्वाची आहे. मानवाची सामाजीक, सांस्कृतीक, भौतिक अध्यात्मीक प्रगतीयांचा एकमेकांशी घनिष्ठ व जवळचा संबंध आहे. यातील प्रगतीस सभोवतालातील विविध घटक कारणीभुत असले तरी महत्वाचे कारण म्हणजे मानवास उपभोगावयास मिळालेले स्वातंत्र्य हेच होते. आपल्या आवडप्रमाणे जीवन जगुन आपला विकास करून घेण्याचा अधिकार त्याने बजावला होता. लागलेले

नवनविन शोध लावण्याचा अधिकार त्याला जेवढा अधिक तो प्रगतीच्या दिशेने अधिक वेगाने जाण्याचे धाडस करू शकतो. मानवी प्रगती ही त्याला मिळणाऱ्या मोकळेपणावर आधारित असते. मानवाला प्रगती करून घेण्याची सहज प्रेरणा मिळत असते. या प्रेरणेला अनुकुल वातावरण स्वातंत्र्य उपलब्ध करू देत असते. आपल्यास एखादे कार्य करावयाचे असेल तर त्यासाठी स्वातंत्र्याची गरज भासत असते मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे बौध्दिक विकास व मानवाची प्रगती होऊन आपल्या कार्यशक्तीत वाढ होत असते. समाज जर पारतंत्र्यात असेल तर तो काहीही करू शकत नाही. त्यामुळे त्याचा विकास देखील खुंटत असतो. नागरिकांना ज्या व्यवस्थेत जास्तीत जास्त स्वातंत्र्य असेल त्या राजवटीतील नागरीकांनी स्वत:चा समाजाचा आणि आपल्या देशाचा सर्वांगीण विकास केल्याचे आढळुन येते म्हणुन विकास व प्रगतीसाठी मानवधिकार फारच मोलाचे व उपयुक्त आहेत.

**संशोधनाचा उद्देश** – ''मानवधिकार'' या संकल्पनेचा अभ्यास करणे हा लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

**उद्दिष्टये :–**

१. मानवाधिकार या संकल्पनेचा आढावा घेणे.
२. भारतीय राज्यघटलेतील लहान मुले व स्त्रीयांच्या अधिकारांचा अभ्यास करणे
३. मनवाधिकाराच्या परिस्थितीचा अभ्यास करणे.
४. मानवधिकाराचा जागतिक जाहीरनामा अभ्यासणे.
५. मानवधिकाराची ओळख करून देणे.
६. मानवधिकाराचा चिकीत्सक अभ्यास करणे.

**माहीती संकलन आणि विश्लेषण :–**

प्रस्तुत लघुशोध संशोधनासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा उपयोग करण्यात येऊन दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यात प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे. संबंधित माहीतीच्या आधारे लघुशोध निबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आली.

**विषयाचे महत्व :—**

समाजात मनुष्य हा जरी जन्मापासुन स्वतंत्र असला तरी त्यांच्यावर अनेक प्रकारची बंधन आहेत. स्त्री व पुरूष, गरीब श्रीमंत, असा भेद आजही दिसत आहे. सामाजिक व आर्थिक विषमतेचे प्रमाण दिससें दिवस वाढत आहे. भारतीय संविधानामध्ये कलम १४ ते ३५ मध्ये स्त्री व पुरूषांना समानतेचा हक्क देण्यात आलेला आहे. तरी स्त्रीयांना आपल्या हक्कापासुन डावलण्यात येते. संविधानात म्हटले आहे. धर्म, वंश, जात, भाषा, लिंग, पंथ सामाजिक वारसा, संपत्ती, जन्मस्थळ इतर दर्जा या कारणावरून अधिकाराच्या उपभोगाबद्दल कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. तसेच ज्या राज्यांत राहत असेल त्या राज्याच्या आंतरराष्ट्रीय दर्जामुळे किंवा ते राज्य कोणाच्या अंकीत असल्यामुळे त्यांच्या मानवाधिकाराचा संकोच होणार नाही अशी ग्वाही देण्यात आली आहे.

**मानव अधिकाराची व्याख्या :—**

१. प्रा. हेरॉल्ड लॉस्कीच्या मते — हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की ज्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला जास्तीत जास्त प्रगती घडवुन आणता येते.
२. रॅन्डम हाऊस — विश्वकोष 'मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त असे अधिकार की, ज्या व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अनावश्यक आहेत.
३. प्रा. बोझांके — आपण ज्या समाजाचे घटक असतो. त्या समाजाचा सर्वोच्च कल्पानाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवुन आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होत.

**मानवधिकार आणि भारतीय संविधान :—**

भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरीकाला अधिकाराचे संरक्षण दिले आहे. मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतात सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी राजकीय व नागरी अधिकांरा बरोबर सामाजिक व आर्थिक अधिकारांचा समावेश संविधानामध्ये केला आहे.

१. **समतेचा अधिकार** — भारतीय संविधानाच्या १४ ते १८ फलकांमध्ये समतेच्या हक्कांचा समावेश करण्यात आला आहे.

**अ) कायदयासमोर समानता :—** संविधानाने प्रत्येक नागरीकास कायदयासमोर समान मानलेले आहे. त्यांना कायदयाचे समान संरक्षण दिलेले आहे. कायदयासमोर समानता म्हणजे व्यक्ती कोणत्याही दर्जाची असो कायदयापेक्षा श्रेष्ठ नाही. सर्व कायदे व न्यायालयांचे आदेश सर्वांनी समान लागु होतील.

**ब) भेदभावाचा अभाव :—** घटनेनुसार धर्म, वंश, जात, जन्मस्थान इत्यादीच्या आधारावर माणसामाणसात भेदभाव केला जाणार नाही. या कारणावरून दुकाने, सार्वजनिक उपहार गृहे, मनोरंजनाची ठिकाणे, विहीर, तलाव, स्मशानभुमी या ठिकाणी कोणालाही मज्जाव केला जाणार नाही तसेच सरकार स्त्रीया व मुलांसाठी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात आवश्यक ते नियम व कायदे करू शकते.

**क) समानसंधी :—** भारतीय संविधानाने सर्व नागरीकांना संधीची समानता दिली आहे. राज्याच्या नियंत्रणाखाली कोणत्याही जागेवर नियुक्त होण्याची सर्व नागरीकांना समान संधी मिळेल.

**ड) अस्पृश्यता निवारण :—** भारतात प्राचीन काळापासुन अस्पृश्यता पाळलीजात होती. अस्पृश्यतेचा कलंक नष्ट करून सामाजिक समानता प्रस्थापित करण्याचे गांधीजींचे स्वप्न भारतीय घटनेने साकार केले आहे. कलम १७ व्या नुसार अस्पृश्यता पाळणे घटनाबाहय ठराविक झाले आहे. १९५५ मध्ये कायदा करून अपृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा ठरविण्यात आला आहे.

**इ) पदव्यांना मनाई :—** व्यक्ती व्यक्तीस कृत्रिमरित्या भेदभाव करण्यात येऊ नये या करिता पदव्या देण्यास बंदी घालण्यात आली आहे. ब्रिटिशांच्या काळात रावसाहेब रावबहादुर, दिवाणसाहेब इत्यादी पदव्या दिल्या जात होत्या. घटनेच्या १८ व्या कलमानुसार त्या रद्द करण्यात आल्या आहेत. मात्र विविध क्षेत्रात कौतुकास्पद कार्य कारणाऱ्या व्यक्तींना सरकारकडुन पदव्या दिल्या जातील. उदा. भारतरत्न पद्‌विभुषण, पद्‌मश्री या पदव्या नसुन पदके आहेत. भारताच्या राष्ट्रपतीच्या परवानगीशिवाय देशातील कोणत्याही नागरिकाला परदेशातील पदवी स्विकारता येणार नाही

२. **स्वातंत्र्यांचा हक्क :—** घटनेच्या १९ ते २२ या कलमामध्ये स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आलेला आहे.

अ) भाषण व मतप्रदर्शन स्वातंत्र्य. ब) निशस्त्रपणे सभा भरविणे. क) संघटन स्वातंत्र्य. ड) संचार स्वातंत्र्य इ) वास्तव्य स्वातंत्र्य. ई) व्यवसाय स्वातंत्र्य. उ) व्यक्ती स्वातंत्र्याची हमी.

लोकशाही यशस्वी होण्यासाठी व्यक्ती स्वातंत्र्य अतिशय महत्वाचे आहे. स्वातत्र्याशिवाय

व्यक्तीला आपल्या अनुभवाचा अन्वयार्थ लावण्याची मुभा असु शकत नाही. नागरीकांना

स्वतंत्रपणे जगण्याची संधी दिल्यास त्यांच्यातील सद्गुण वाढीस लागतील व त्याचा फायदा

सर्वांनाच मिळेल.

३. **पिळवणुकी विरूध्दचा हक्क** :— भारतात फार पुर्वीपासुन वेठबिगारी, देवदासी, सतिप्रथा, माणसांची क्रय विक्रय इ. प्रथा अस्तीत्वात होत्या. या रूढीच्या माध्यमाद्वारे पददलीत वर्गाची स्त्रियांची पिळवणुक होत होती. म्हणुन घटनेच्या २३ व्या कलमानुसार या सर्व रूढी घटनाबाहय ठरविण्यात आल्या आहेत. तसेच १४ वर्षाखालील मुलामुलींना कारखाने, खाजगी किंवा धोक्याच्या ठीकाणी कामाला लावण्यास प्रतिबंध केला आहे मात्र सरकार सार्वजनिक हितासाठी लोकांकडुन एखादे काम करू शकते उदा. युध्दकाळात सक्तीने लष्कर भरती मात्र सक्ती करतांना धर्म,जात, लिंग या आधारावर भेदभाव केला जाणार नाही.

४. **धार्मिक स्वातंत्र्य** :— भारतीय संविधानाच्या २५ व्या कलमात धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काविषयी चर्चा करण्यात आली आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या ईच्छेनुसार धर्म बदलण्याचा, पुजा व अर्चा करण्याचा अधिकार दिला आहे. धार्मिक कार्यासाठी व्यक्ती धार्मिक संस्था वा मंडळे स्थापन करू शकतात. धार्मिक कार्यासाठी देणगी जमा करता येणे मात्र देणगी जमा करतांना सक्ती करता येत नाही. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे कारण भारताचा अधिकृत असा कोणताही धर्म नाही. सर्व धर्मांना समान स्थान आहे.

५. **सांस्कृतिक व शैक्षणीक हक्क** :— घटनेच्या २१ व्या कलमानुसार प्रत्येक नागरीकाला आपली भाषा, लिपी, संस्कृती जतन करण्याचा अधिकार आहे. ३० व्या कलमानुसार भाषीक व धार्मिक अल्पसंख्याक आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी शिक्षणसंस्था स्थापन करू शकतात. या संस्थांना मदत देतांना सरकार कोणताही भेदभाव करणार नाही.

६. **घटनात्मक उपाययोजनेचा हक्क :—** भारतीय घटनेच्या ३२ व्या कलमानुसार घटनात्मक उपाययोजना हक्क दिलेला आहे. या कलमाचे महत्व सांगतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, हा कलम (३२) म्हणजे घटनेचा आत्मा आहे. घटनात्मक उपाययोजनेच्या हक्कानुसार व्यक्तीच्या मुलभुत हक्कांवर अतिक्रमण झाल्यास संबंधित व्यक्तीला न्यायालयाकडे दाद मागता येते. त्यावर व्यक्तींच्या हक्कांच्या रक्षणासाठी न्यायालयात पुढील पाच प्रकारचे अर्ज सादर करण्यात येतात.

अ) बंदीप्रत्यक्षीकरण. ब) परमादेश. क) प्रतिषेध. ड) उत्प्रेषण. इ) अधिकार पृच्छा इत्यादी अशा प्रकारचे हे घटनात्मक उपाययोजनेचे हक्क आहेत.

**मानवाधिकार आयोग :—**

१९७३ मध्ये भारतीय संसदेने मानवाधिकार संरक्षण कायदा केला या कायदयाप्रमाणे एक राष्ट्रीय मानवाधिकार आयोग स्थापन करण्यात आला आहे. मानवाधिकार आयोगात एकुण पाच सदस्य असतात. त्यातील एक आयोगाचा अध्यक्ष असतो. आयोगाचा अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य न्यायाधीश असतो. इतर सभासदांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त व उच्चन्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश यांचा समावेश असतो. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा हे आयोगाचे पदसिध्द सभासद असतात आयोगाच्या कामकाजाचे वार्षिक अहवाल संसदेस सादर केले जातात. गेल्या अनेक वर्षापासुन महत्वांच्या प्रकरणांची चौकशी करून मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी अतिशय महत्वपुर्ण काम केलेले आहे. काही राज्यांमध्ये राज्य मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. स्वत: पुढाकार घेऊन किंवा कोणाच्या अर्जावरून समोर आलेल्या तक्रारीतील मानवाधिकाराचे उल्लंघन तसेच हे उल्लघन होऊ न देण्यासाठी सरकारी अधिकारी आप आपल्या कर्तव्यात चुकला काय ? या गोष्टींची चौकशी करण्याचा अधिकार मानवाधिकार आयोगास आहे. मानवाधिकारांच्या योग्य संरक्षणासाठी उपाययोजना सुचविणे, मानवाधिकारांविषयी जागृती निर्माण करणे व सार्वजनिक संघटनांच्या मानवाधिकारा विषयक कामास प्रोंत्साहन देणे इत्यादी गोष्टी आयोग करू शकतो. आयोगाला आपल्या कामकाजात पुर्ण स्वातंत्र्य व स्वायत्तता यांची हमी या कायदयाने दिली आहे. चौकशीनंतर दोषी आढळलेल्या व्यक्तीच्या विरोधी कारवाई करण्याची शिफारस आयोग राज्य किंवा केंद्रसरकारला करू शकते.

भारतासारख्या विकसनशील देशात मानवाधिकाराचा उपभोग लोकांनी घ्यावयाचा असेल तर पुढील प्रमाणे कार्यक्रम राबविला पाहीजे.

१. राजकीय किंवा आर्थिक निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेत जे गुंतलेले आहेत असे राजकीय नेते, कार्यकर्ते व प्रशासकीय व्यवस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांनाही मानवाधिकाराचे महत्व पटविले पाहीजे. त्यासाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाची सोय करावी लागेल.
२. मानवाधिकार कोणते आहेत ते उपभोगण्याचा सर्वांना अधिकार कसा आहे हे लोकांना समजावुन सांगण्यासाठी विशिष्ट अशा यंत्रणेची स्थापना करावी लागेल. सर्व प्रौढ व्यक्तींना मानवाधिकारांची ओळख अल्पमुदतीच्या प्रशिक्षण वर्गात सोप्या पध्दतीने करून द्यावी लागेल.
३. मानवाधिकारांच्या बाबतीत संरक्षणाची आवश्यकता दुर्बल घटक, महिला यांची जास्त असते. सर्व जातीतील व धर्मातील स्त्रिंया, आदिवासी, मागासजाती व जमाती, अपंग आणि वृध्द यांना विशंष संरक्षणाची गरज असते. माणुस म्हणुन त्यांना इतरांसारख्याच असलेल्या अधिकारांचे संरक्षण करावयाचे असेल तर त्यांना विशेष वागणुक दयावी लागेल उदा. अपंग व्यक्तींना जगण्याचा व चारितार्थासाठी काम करण्याचा अधिकार असेल तर त्या व्यक्तीला करता येईल असे काम समाजाने पुरविले पाहीजे. स्त्रियांना बाळंतपणात हक्कांची रजा, आई काम करित असतांना लहान मुलांना सांभाळण्याची व्यवस्था, ज्येष्ठ नागरीकांना विशेंष सवलती अशा काही गोष्टी आता होत आहेत या सवलती म्हणजे मानवाधिकाराचाच एक भाग आहे. अशा सवलती देण्याचे समाजाच्या या वर्गावर आपण उपकार करत नसुन त्यांचा अधिकारच त्यांना देणे आहेत हे इतरांना शिकविले पाहीजे.

**मुल्यमापन :—**

मानव अधिकार घोषणा पत्रातील तरतुदीव्दारे आधुनिक लोकशाही कल्याणकारी आणि सामाजिक न्यायपुर्ण व्यवस्था निर्माण करण्यासाठी एक आदर्श रूपरेषा तयार करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवाधिराचें संहतीकरण करण्याचा पहीला प्रयत्न मानव अधिकार घोषणापत्राव्दारे युनोने केलेला आहे या घोषणा पत्रामुळेच मानवाधिकाराची व्याप्ती स्पष्ट होण्यास हातभार लागला. मानवाधिकार हे कोणत्याही राष्ट्राने किंवा समाजाने दिलेले नसुन जन्मत:च प्रत्येक व्यक्तीस निसर्गाने अधिकार प्रदान केलेले आहेत ही भुमीका मान्य करण्यात आली मानवाधिकार हे देशांतर्गत

कायदयाचा एक भाग मानली जात होती. परंतु मानवीहक्क जाहीनाम्यामुळे मानवाधिकाराचा राष्ट्रीय पातळीवरून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत विस्तार घडुन आला. मानवाधिकार जाहीरनाम्यातील अनेक अधिकारांचा समावेश जगातील विविध देशांनी आपल्या राज्यघटनेत केलेला आढळतो. मानवाधिकार जाहीरनाम्याने मानवधिकाराच्या बीजारोपणाबाबत महत्वपुर्ण भुमीका बजावलेली आढळते. प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्यासाठी मानवाधिकाराची गरज असते. त्याशिवाय विकास साध्य करता येणार नाही मानवास मानवपण मिळवुन देण्यासाठी मानवाधिकाराचे योगदान महत्वपुर्ण आहे.

## संदर्भग्रंथ सुची

१. प्रा. मुळीक आर. जी — भारतीय शासन सौ. सिंधुताई राजाराम मुळीक वसंतनगर सांगली

२. देशमुख बी. टी — भारतीय संविधान पिंपळापुरे अॅड. कं. पब्लीशर्स, नागपुर

३. डॉ. पवार प्रमोद. — भारतीय संविधान व शासन प्रशांत पब्लीकेशन्स, डॉ. तुंटे विजय जळगाव.

४. डॉ. राठी शुभांगी — भारतीय संविधानाची ओळख अर्थव पब्लीकेशन,. जळगांव.

५. डॉ. पाटील महेंद्र — भारतीय संविधान आणि राज्य व्यवस्था अथर्व पब्लीकेशन्स, जळगाव .

६. चपळगावकर नरेंद्र — विकास : संकल्पना आणि मार्ग (डॉ.दिनेश भोंडे)
कुलकर्णी महेश, — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.